# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक:09.09.2026** **वार:बुधवार**

---

**ठळक बातम्या**

1. भारतानं नवोन्मेष आणि समावेशनाच्या मदतीनं वित्ततंत्रज्ञान क्षेत्राला नवी उंची प्राप्त करुन दिली; पंतप्रधानांचं प्रतिपादन.
2. पश्चिम विभागातील समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिकेच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचं पंतप्रधानांच्या उपस्थितीत लोकार्पण.
3. सागरी आणि संरक्षण भागीदारीसह परस्पर फायदेशीर क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशानं संरक्षणमंत्री श्रीलंकेच्या दौऱ्यावर.
4. 'राष्ट्रीय पोषण माह' अभियानाला आजपासून देशभरात सुरुवात.
5. नैऋत्य मोसमी पाऊस परतीला लागण्यापूर्वी, देशात मान्सूनचा जोर पुन्हा एकदा वाढणार; हवामान विभागाचा अंदाज.

**पंतप्रधान जी. एफ. एफ.**

भारतानं नवोन्मेष आणि समावेशनाच्या मदतीनं वित्ततंत्रज्ञान क्षेत्राला नवी उंची प्राप्त करुन दिली आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. नवनव्या तंत्रज्ञानामुळे आर्थिक क्षेत्रात नव्या संधी निर्माण होत असल्याचं सांगून ते म्हणाले...

***21वीं सदी का दूसरा क्वार्टर हमारे लिए और भी नई संभावनाओं को लेकर आया है। एजेंटिक एआई टोकनाइजेशन, क्वांटम ऐसी टेक्नोलॉजी फाइनेंशियल सेक्टर में नई संभावनाओं के द्वार खोल रही है। अब हमारे सामने चुनौती है। इन संभावनाओं को वास्तविक इम्पैक्ट में कैसे बदलें।***

भारताची युपीआय देयक प्रणाली वित्ततंत्रज्ञान क्षेत्रात क्रांतीकारी ठरली असून सध्या 11 देशांमधे ही प्रणाली वापरली जात आहे अशी माहिती पंतप्रधानांनी दिली, त्यासोबतच, वित्ततंत्रज्ञान हे आर्थिक समावेशनाचं साधन बनावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. वित्ततंत्रज्ञान कंपन्यांनी सर्वोच्च सायबर सुरक्षा, नैतिक डेटानिर्मिती मानकं, वित्ततंत्रज्ञान आधारित मजबूत औद्योगिक नवोन्मेष परिसंस्था आणि वित्ततंत्रज्ञान ग्राहक संरक्षण निर्देशांक यांची निर्मिती करावी असं आवाहन मोदी यांनी केलं.

**पंतप्रधान जे.एन.पी.टी.**

पश्चिम आणि पूर्व समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिका देशाच्या मालवाहतूक, साठवण व्यवस्थेला एक नवी गती आणि दिशा देणारी ठरेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. पश्चिम समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिकेच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचं लोकार्पण काल मोदी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

प्रवासी आणि मालवाहतूक रेल्वे स्वतंत्र झाल्यामुळे दररोज 430 पेक्षा अधिक मालगाड्या धावू शकतात. त्यामुळे इंधनाची बचत, मालवाहतुकीच्या खर्चात घट आणि पर्यावरणाचं संरक्षण यांसारखे अनेक फायदे होत आहेत. रेल्वेच्या आधुनिकीकरणावर होणारा खर्च मोठ्या प्रमाणात नवीन रोजगार निर्माण करत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

जे.एन.पी.टी. इथं झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसहित अन्य मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते.

तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल गुजरातमधील वडोदरा इथं 35 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास उपक्रमांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. मोदी यांनी अलिराजपूरच्या दुर्गम आदिवासी प्रदेशांना राष्ट्रीय रेल्वे ग्रीडशी जोडणाऱ्या टांडा रोड आणि वडोदरा दरम्यान नवीन प्रवासी रेल्वे सेवेसह न्यू सानंद, न्यू मकरपुरा, न्यू उंबरगाव आणि न्यू जेएनपीटी या मालवाहू रेल्वे सेवेला हिरवा झेंडा दाखवला. त्यांनी 9,700 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या तीन रेल्वे विस्तार प्रकल्पांची पायाभरणीही केली.

**<u>राजनाथ सिंह-श्रीलंका दौरा</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तीन दिवसांच्या श्रीलंका दौऱ्यासाठी काल कोलंबोत दाखल झाले. श्रीलंकेतील सर्वोच्च नेतृत्वाशी मजबूत सागरी आणि संरक्षण भागीदारीसह परस्पर फायदेशीर क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करणं हा त्यांच्या दौऱ्याचा उद्देश आहे. काल त्यांनी श्रीलंकेतील भारतीय समुदायाशी संवाद साधला. दोन्ही देशांमधील संबंध इतिहास, संस्कृती आणि विश्वासावर आधारित असून, संकटाच्या वेळी भारत नेहमीच श्रीलंकेसोबत खंबीरपणे उभा राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली. आपल्या भाषणात राजनाथ सिंह यांनी भारताच्या वेगाने वाढत असलेल्या आर्थिक वृद्धीचा आढावा घेतला.

**<u>चित्रपट पुरस्कार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते, येत्या 22 सप्टेंबरला, गुजरातमधील एकता नगरमध्ये, 72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण होणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या निर्णयानुसार, देशाच्या विविध भागांमध्ये राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आयोजित करण्यात येणार आहेत. एकता नगर इथे होणाऱ्या या सोहोळयाच्या माध्यमातून, 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देईल.

**<u>राष्ट्रीय पोषण माह</u>**

केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयातर्फे आजपासून देशभरात '9 वा राष्ट्रीय पोषण माह' अभियान राबवण्यात येणार आहे. 'आपल्या अंगणवाड्या, आपली जबाबदारी' ही राष्ट्रीय पोषण महिन्याची यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना आहे. आहारातील विविधता, पुरेशी प्रथिनं, अंगणवाडी केंद्रांमधील ताजं आणि गरम शिजवलेले अन्न, सामुदायिक मालकी आणि उत्तरदायित्व, पोषण आणि बालवयातील विकासासाठी शिक्षण, तसंच 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजने'ची दहा वर्षे या बाबींवर या उपक्रमात विशेष भर देण्यात येणार आहे. याच अनुषंगाने वाराणसीत तसंच महाराष्ट्रातील पालघर मध्ये विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>अमेरिका-इराण संघर्ष</u>**

अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा परस्पर हल्ले सुरू झाल्याने पश्चिम आशियातील तणाव वाढला आहे. यामुळे या प्रदेशात संघर्ष पुन्हा तीव्र होण्याची भीती वाढली आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात आयआरजीसीनं गेल्या दोन दिवसांत अमेरिकेच्या युद्धनौकेवर केलेल्या हल्ल्यांनंतर अमेरिकी सैन्याने इराणचे कच्चे तेल घेऊन जाणारे पाच टँकर्स नष्ट केल्याचा दावा अमेरिकेनं केला आहे. प्रत्युत्तरादाखल इराणने जॉर्डनमधील अमेरिकेच्या ठिकाणांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला.

**<u>मराठा आरक्षण</u>**

महाराष्ट्रात, मराठा आरक्षणाच्या अनुषंगानं निर्माण झालेल्या विविध बाबींचा आढावा घेऊन प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीतील त्रुटी आणि अडचणींचं निराकरण, प्रलंबित प्रश्नांचा निपटारा तसंच आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी आज सकाळी छत्रपती संभाजीनगर इथं उच्चस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी काल ही माहिती दिली.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर उपस्थित झालेल्या सर्व मुद्द्यांचं सरकारनं निराकरण केलं आहे. तरीही त्यात काही अडचणी वाटत असतील तर मनोज जरांगे यांनी त्यांचं निरसन करून घ्यावं असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

**गणेशोत्सव-टोलमाफी**

आगामी गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या नागरिकांच्या वाहनांना पथकर अर्थात टोल भरण्यातून सूट देण्यात येणार असल्याची घोषणा काल महाराष्ट्र सरकारनं केली. मुंबई-बेंगळुरू महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसंच कोकणाकडे जाणाऱ्या इतर रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर 11 ते 27 सप्टेंबर या कालावधीत ही सूट लागू राहील. यासाठीचे प्रवाशांनी जवळची पोलिस स्थानकं, वाहतूक पोलिस चौक्या आणि आरटीओ कार्यालयांमध्ये 'गणेशोत्सव 2026 कोकण दर्शन' असे लिहिलेले विशेष स्टिकररूपी पास मिळवून ते वाहनावर लवावेत असे निर्देश देण्यात आले आहेत. परतीच्या प्रवासासाठीही हा पास वैध राहणार आहे.

**आशियाई खेळ**

2026 च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होत असलेल्या भारतीय पथकाला काल नवी दिल्लीत केंद्रीय युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्री मानसुख मांडवीय यांच्या उपस्थितीत निरोप देण्यात आला. यावेळी भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा डॉ. पी. टी. उषा, क्रीडा सचिव हरी रंजन राव आणि संघनायक सहदेव यादव उपस्थित होते. या प्रसंगी भारतीय पथकाच्या अधिकृत जर्सीचे अनावरण करण्यात आले. खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्याचा दबाव न घेता त्याकडे संधी म्हणून पाहावं आणि त्या संधींचं रूपांतर यशात करावं असं आवाहन मांडवीय यांनी यावेळी बोलताना केलं.

**आर्चरी स्पर्धा**

अहमदाबाद इथं सुरू असलेल्या जागतिक पॅरा तिरंदाजी स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी काल 2 सुवर्ण, 2 रौप्य आणि 1 कांस्य अशा 5 पदकांची कमाई केली आहे.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पावसाच्या परतीपूर्वीच्या टप्प्यात देशात मान्सूनचा जोर पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. 12 ते 21 सप्टेंबर दरम्यान मध्य, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम भारताच्या बहुतांश भागात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

हवामान विभागानं आज इशान्येकडील राज्ये, तसंच बिहार, पश्चिम बंगालचा काही भाग, झारखंड, नागालँड आणि ओडिशामध्ये आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे, हिमाचल प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातही पुढील तीन चार दिवसांत विजा आणि वादळी वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.